# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 09.04.2024** **वार: मंगळवार**

---

**गुढीपाडवा**

पुण्यासह सर्वत्र आज चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त घरोघरी नागरिकांनी गुढ्या उभारल्या आहेत. मठ - मंदिरातही पहाटेपासुन धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हिंदू नववर्ष दिन असल्याने गुढीपाडव्याच्या मंगलमय शुभेच्छा देत शहराच्या विविध भागात स्वागत मिरवणूक काढण्यात आली होती. सार्वजनिक ठिकाणीही मांगल्याचे प्रतिक असलेल्या गुढी उभारण्यात आली. तर श्रीमंत दगडूशेठ गणपतीचं दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गणेश मंडळे तसंच सामाजिक संस्थांनी देखील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून, संपूर्ण शहरभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. कोथरूड इथल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अभिनेते संकर्षण कऱ्हाडे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांच्या हस्ते सांस्कृतिक गुढी उभारून पूजा करण्यात आली.

सोसायटी मतदान केंद्रलोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी कमी मतदान असलेल्या शहरांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांत मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून असा उपक्रम देशात प्रथमच राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची मूळ संकल्पना पुणे जिल्ह्याची असून पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी आणि  जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

जिल्ह्यातील ४ लोकसभा मतदार संघांच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम सुरू असून बारामती लोकसभा मतदार संघाची अधिसूचना १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल आहे. तर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम मुदत २२ एप्रिल आहे. पुणे, शिरुर आणि मावळ मतदार संघांची अधिसूचना प्रसिद्धी १८ एप्रिल रोजी, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत २५ एप्रिल तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत २९ एप्रिल २०२४ अशी आहे.

आजपर्यंत पुणे जिल्ह्यात ४३ लाख २८ हजार ९५४ पुरूष, ३९ लाख ६३ हजार २६९ स्त्री तर ७२८ तृतीयपंथी अशा एकंदर ८२ लाख ९२ हजार ९५१ मतदारांची नोंद झाली आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज क्र. ६, आणि स्थलांतरणासाठी अर्ज क्र. ८ सादर करण्याची अद्यापही संधी असून बारामती मतदार संघात ९ एप्रिलपर्यंत तर अन्य तीन मतदार संघात १५ एप्रिलपर्यंत आलेल्या अर्जांवर निवडणूक प्रशासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे.

**मातंग**

महाराष्ट्र राज्यात पाच राखीव मतदार संघ असून कोणत्याही पक्षाने मातंग समाजाला उमेदवारी दिली नाही याचा निषेध म्हणून लहुजी परिवर्तन आघाडी राज्यभरात विविध ठिकाणी मातंग समाजाचे उमेदवार उभे करणार आहेत. पुण्यातून संजय केंदळे यांची उमेदवारी लहुजी परिवर्तन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष विकास सातारकर यांनी जाहीर केली आहे.

दरम्यान निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवार नागरिकांच्या भेटीगाठी घेत मतदानाविष्यी जनजागृती करण्यावर भर देत आहेत.शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ पिंपरी-चिंचवड शहर युवा सेनेच्या पदाधिका-यांचा मेळावा आयोजित केला होता.

तर पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीकडून शेतकरी, महिला, युवा, भागीदारी आणि  श्रमिक न्यायाची गुढी आज महाविकास आघाडी आणि मित्रपक्षांचे कॉंग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या हस्ते कॉंग्रेस भवन येथे उभारण्यात आली.

**<u>आंबा</u>**

कोकणातील हापूस आंबा यंदा लवकर बाजारपेठेत दाखल झाल्यानं गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पुण्यात मोठ्या प्रमाणावर आंबा विक्री झाली. दरवर्षी सर्वसाधारणपणे अक्षय तृतीयेपासून आंब्याचा हंगाम सुरु होतो, मात्र यंदा आंबा बाजारपेठेत लवकर दाखल झाल्याने आणि आवक वाढल्यानं गुढीपाडव्याच्या सणासाठी आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात  आले. त्यामुळं गुढीपाडव्याच्या सणासाठी यंदा आंब्याला चांगली मागणी दिसून आली. दरम्यान कोकणातील चांगल्या प्रतीचा हापूस आंबा सध्या १ हजार रुपये प्रति डझन पासून १६०० ते १८०० रुपये प्रति डझन दरापर्यंत बाजारात उपलब्ध झाला आहे . आगामी काही दिवसांत आंब्याची आवक आणखी वाढणार असल्यानं किमान ५०० ते ६०० रुएयांपासून आंबा बाजारात उपलब्ध होईल असं प्रमुख विक्रेत्यांनी म्हटलं आहे .

**<u>म्हाडा पुणे मंडळ</u>**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या म्हणजे म्हाडाच्या पुणे मंडळाने नागरिकांना घरांसाठी अर्ज करण्याला मुदतवाढ दिली आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणीची मुदत काल सायंकाळी पाच वाजेपर्यंत होती. मात्र, आता ३० मे रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत नागरिकांना अर्ज करता येणार आहेत.

**<u>पब</u>**

पुणे शहरात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या दोन पबवर पुणे पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत २८ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रात्री दीडनंतर डीजे वाजवून पब चालू असल्यामुळे गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 18 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस होतं. उद्या आकाश मुख्यतः निरभ्र राहून दुपारनंतर ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,**

**संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**